# प्रकरण पाचवे

# 'पुत्र मानवाचा' या कादंबरीतून प्रगट होणारे गांधीजींचे जीवनदर्शन व तत्त्वज्ञान

## प्रकरण पाचवे

# 'पुत्र मानवाचा' या कादंबरीतून प्रगट होणारे गांधीजींचे जीवनदर्शन व तत्त्वज्ञान

### अ) आदर्शवादी व्यक्तिमत्त्व आणि राष्ट्रवाद :-

मृणालिनी देसाई यांना काकासाहेब कालेलकर यांचा थोर साहित्यिक वारसा मिळालेला पहावयास मिळतो. म्हणूनच मृणालिनी देसाई ह्यांनी गांधीचरित्रावर कादंबरी लिहू शकल्या. 'पुत्र मानवाचा' या कादंबरीत काही काल्पनिक पात्राच्या माध्यमातून त्यांनी गांधीचरित्र मांडण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. पण, या कादंबरीला सत्याचा स्पर्श व्हावा असे 'काकासाहेब कालेलकर' यांना वाटत होते. म्हणूनच कादंबरीच्या स्वगत भागात ते म्हणतात, ''गांधीविषयी लिहिणाऱ्या लोकांना मी नेहमी सांगत असतो, आपल्या लोकांना चरित्रे लिहिणे साधत नाही. लोक महात्म्यच लिहितात. संतांची चरित्रे असोत किंवा अवतारी पुरुषांच्या जन्मकार्याचे वर्णन असो, लोक सत्य हकिकतींना बाजूला सारून भक्तीच्या नावाने कल्पनेला वाव देतात आणि माहात्म्य वाढवतात. गांधीजींना आपण जिवंतपणीच महात्मा ही पदवी दिली, आता त्यांचे महात्म्य वाढवण्यासाठी वाटेल ते लिहिण्याची मोकळीक. अशा आपल्या लोकांना मी नेहमी विनंती करतो.'' याच विचारांना अनुसरून मृणालिनी देसाई यांनी गांधीचरित्र लिहिण्याचा केलेला प्रयत्न सार्थक ठरतो. 'पुत्र मानवाचा' ही कादंबरी जरी एक चरित्र असले तरी यामध्ये गांधीजींचे बालपण येत नाही. पण आफ्रिकेत लॉ ची पदवी घेऊन त्यांनी तेथेच भारतातून गेलेल्या 'हिंदू - मुसलमान' यांच्यावर होणाऱ्या अत्याचाराला दूर करण्याचा प्रयत्न केला. येथूनच गांधीजींच्या कार्याला सुरवात होताना दिसते. गांधीजी आफ्रिकेतून लोकोत्तर कार्य करून एक मोठा अनुभव घेऊन भारतीय स्वातंत्र्य प्राप्त करण्यासाठी हिंदुस्थानात येतात. येथूनच 'पुत्र मानवाचा' या कादंबरीची खरी सुरवात होते.

गांधीजींचे संपूर्ण चरित्र जरी या कादंबरीतून जाणवत नसले तरी त्यांच्या आदर्शवादी व्यक्तिमत्त्वाची छाप जाणवल्याशिवाय राहत नाही. निवेदकाच्या माध्यमातून वाचकांसमोर गांधीचरित्र प्रत्यक्ष सादर करण्याचा प्रयत्न हा स्तुतीपर दिसतो. गांधीजींचा परिचय होतो, तो वर्तमानपत्रातून आणि तेथूनच खऱ्या अर्थाने गांधीजींचे व्यक्तिमत्त्व जाणवू लागते. मोतीहारीच्या खटल्यात गांधीजींवरती खटला भरला होता. तेव्हा चंपारण्य सोडून जावे असे इंग्रजांनी बजावूनही हा गृहस्थ जाण्यास तयार नव्हता. येथेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची छाप दिसते व त्यांचा राष्ट्रवाद स्पष्ट होतो. गांधीजींचे विचार परखड होते. याचा प्रत्यंतर बनारसच्या अधिवेशनात येतो. तेव्हा ते म्हणाले होते, ''जर आपल्याला स्वराज्य पाहिजे असेल तर ते आपल्याला घ्यावे लागेल. ते मागून मिळणार नाही. इंग्रजी साम्राज्याचा आणि इंग्रज राष्ट्राचा इतिहास पहा. जे स्वत:च्या हिंमतीवर स्वराज्य मिळवू शकणार नाहीत. त्यांना इंग्रज लोक आपण होवून ते कधीही देणार नाहीत.''[१] गांधीजी दिसण्यास जरी गबाळे वाटत असले तरी त्यांच्या बोलण्यात भारदस्तपणा होता. उघड उघडपणे ते इंग्रजांना 'मला शिक्षा करा' म्हणत. म्हणूनच असे म्हणावेसे वाटते की, इतिहास घडवणारी माणसे मनगटाच्या बळावर दैवाला ठोकरून देतात. कोणत्याही शिक्षित वा अशिक्षित व्यक्तींना ते आपलेसे करत. कोणालाही सक्तीने स्वराज्य कार्यात यावयास सांगत नसत. यातच त्यांचे आदर्शवादी व्यक्तिमत्त्व दिसून येते.

भोळे - भाबडे लोक गांधीजींना देव मानीत होते. गांधी म्हणजे देवाने धाडलेला कोणी तारणहार आहे असे त्यांना वाटत होते. रंजल्या - गांजल्यांना आपलेसे करणारा हा कोणी साधू आहे - संत आहे अशी त्या लोकांची श्रद्धा होती. कायदेपंडित असल्यामुळे अत्यंत व्यवहारी, हिशोबी आणि अतिशय आतल्या गाठीचे होते. गांधीजी नेहमी म्हणत, 'विश्वची माझे घर' गांधीजींचे व्यक्तिमत्त्व लोकविलक्षण होते. 'सत्याग्रहा'विषयी त्यांना अविचल श्रद्धा होती. अगदी ते जिवंत ज्वालामुखीसारखे जाणवत होते. गांधींच्यामध्ये साधूत्व दिसत होते. चंपारण्यात असताना त्यांनी 'सफाई', 'लोकशिक्षण' ही कामे

सुरू केली होती. अनेक लोक त्यांना 'विलक्षण माणूस' म्हणत. गिरणीमालकांच्या विरोधात मजुरांचा संप ते हाताळत होते. म्हणूनच त्यावेळी त्यांनी स्वत:चे जगावेगळे शस्त्र उपसले ते म्हणजे 'आमरण उपवास' गांधीजी देशाच्या कानाकोपऱ्यात जात, तेव्हा स्वत:बरोबर काहीही नेत नसत. राहण्यात व खाण्यात साधेपणा होता. वेगवेगळ्या गावात प्रार्थना होत. त्यानंतर काही स्त्रिया त्यांना भेट देत तेव्हा गांधीजी म्हणत, 'बेटी तुझी भेट हरिजनांसाठी घेतो आहे हं चालेल ना ?' गांधीजी नेहमी साधा मानपान स्वीकारत पण, एके दिवशी नकळत आलिशान बंगल्यात राहावे लागले. त्याबद्दल ते म्हणाले होते, "काल ताप चढला होता. डोळे उघडले तरी धड कळत नव्हतं, दिसत नव्हतं, संध्याकाळी जरासा ताप उतरला नी पाहतो तो आजूबाजूला मोठा राजेशाही महाल! शरीराबरोबर मनही जळू लागले. आश्रमातच माझं स्थान. मी हट्ट धरून येथे आलो. जवळच्या माणसांना हा हट्टीपणा आवडला नाही. पण ताप उतरल्यावर देखील डोळ्याला डोळा लागला नाही माझा. मी कसा वहावत चाललो आहे ! कामामागून कामं घेत गेलो. पण एकही तडीला नेलं नाही. चंपारण्याचे काम तसेच राहिलं. मजुरांचा हरताळ संपला, पण त्या वस्तीत सतत काम करायला हवे. सुधारणा करायला हवी. ते टाकून खेडा जिल्ह्यात गेले. शेतकऱ्यांची दशा तशीच उघड्या डोळ्यांनी बघत लष्करभरतीसाठी जिवाचा आटापिटा केला..... मी हा असा एक ना धड भाराभर चिंध्या घेऊन बसलो.... आणि तुमच्यासारखे होतकरू तरुण माझ्यामागून आले... त्यांनाही मी तोंडघशी पाडलं ! हा आश्रम उभा केला. घराचा आसरा टाकून आलेले लोक इथं झोपड्यांत..... आणि मी ? मिरझापुरातल्या बंगल्यात ? देवाने तरी कशी क्षमा करावी मला ?"[२] या संदर्भावरून गांधीजींचे आदर्शवादी व्यक्तिमत्त्व जाणवतेच पण प्रखर राष्ट्रवादी भावना दिसून येते.

बापूंनी एका सभेत सर्वांना सत्याग्रह समजावून सांगून प्रतिज्ञा घ्यावयास लावली. स्वत:ही लांडा पंचा नेसून, अस्थिपंजर घेऊन, विरक्त विरागी असे प्रतिक लोकांच्या



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

नजरेत भरत. गांधीजीविषयी असे बोलले जात की, लोक त्यांना जुमानीत नाहीत. पण ते खरे नव्हते. लोक त्यांना आदर्शवादी व्यक्ती मानत. वेळोवेळी कायदेभंग करणे, वटहुकुम सोडणे अशा राष्ट्रवादी कृती ते सतत करत. गांधींबरोबर लोकांचा वावर वाढला होता. अबालवृद्ध त्यांच्या बरोबर होतेच. पण बायकाही खूप जमत. गांधीजी त्यांच्याविषयी 'जगन्माता', 'आदिशक्ती' असे शब्द उच्चारत. गांधीजी कोणाच्या घरी राहत, तेव्हा ते सहकाऱ्यांना 'आपापली कामे करून घ्या' असे म्हणत. खादीविषयी ते म्हणत, ''पुढाऱ्यांनी खादी वापरलीच पाहिजे. पण ती स्वत: कातलेली असली तर मला फारच आवडेल.''[३] अनेक थोर राष्ट्रपुरुषांविषयी त्यांना आदर होता. म्हणूनच लोकमान्य टिळकांविषयी म्हणाले होते, 'हा लोकमान्यांच्या पुण्याचा प्रभाव ! ही त्यांच्या नावाची जादू !' गांधीजींना अनेक वेळा कारावास भोगावा लागला होता. उपवासांचे अस्त्र गांधीजी वेळोवेळी काढत. सर्वांचे म्हणणे ऐकून घेत. विचार करीत स्वत: कमी बोलत, सत्याची उपासना करत इ. व्यक्तिमत्त्वातील बाबी दिसून येतात.

गांधीजींच्या व्यक्तिमत्त्वातून त्यांचा राष्ट्रवाद जाणवतोच. पण त्यांचे विचारही खूप मौलिक वाटत. त्यांचे आदर्शवादी व्यक्तिमत्त्व व्यक्त करताना कादंबरीकार म्हणतात. ''प्रत्येकजण आपआपले (जसे असेल तसे) व्यक्तित्त्व घेऊन त्यांच्या कक्षेत वावरत होता. म्हणूनच कशाचा कशाला ताळमेळ नसल्यासारखे होऊन गेले होते आणि त्यातून एक नवी जीवननिर्मिती करण्यासाठी बापू धडपडत होते. नाना प्रयोग करीत होते. प्रत्येकाच्या स्वतंत्र विकासाला वाव देऊन त्याला समष्टीत सामावून घेण्याची त्यांची इच्छा होती. झाडाच्या वाढीसाठी फांद्या छाटाव्या तसे ते आश्रमीयांच्या जीवनात काटछाट करीत होते. उठण्याबसण्याला, खाण्यापिण्याला, बोलण्याचालण्याला विशिष्ट वळण देत होते. ते वळण घेऊन सहप्रवृत्ती फुलावी आणि ते पूर्ण व्यक्तित्त्व समाजाला अर्पण करावे हा त्यांचा प्रयोग होता.''[४] 'माझे सत्याचे प्रयोग' हे आत्मचरित्र गांधीजींनी

तुरुंगवासात लिहून काढले होते. त्यातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू दिसून येतात ते म्हणजे सहृदयता, सरळता, जिद्द, निर्भयता असे अनेक गुण त्यातून दिसून येतात. गांधीजींनी राजकारण सोडले होते, पण त्यांना राजकारणाने सोडले नव्हते. याचा प्रत्यंतर सारखा येत असे. गांधीजी एक निश्चित योजना आखीत होते. सबंध देशभर सार्वत्रिक कायदेभंगाची चळवळ सुरू करावी यासाठी त्यांनी मिठाचा सत्याग्रह करण्याचे ठरवले. यातच त्यांचा खरा राष्ट्रवाद दिसून येतो. १२ मार्च रोजी दांडीयात्रा चालू होणार होती, पण गांधीजींच्या आश्रमातून ११ मार्च रोजी माणसे भजनानंतर जाण्याऐवजी वाढतच होती. प्रत्येकाच्या मुखात गांधीजींचे आवडते भजन, 'वैष्णवजन तो तेणे कहीये जे पीड पराई जाणे रे' सुरू होते. गांधीजींच्या आश्रमात बाया, माणसे, मुले, आजारी माणसे अशा लोकांचा कुटुंबकबिला होता. एके दिवशी एक हरिजन जोडपे आले तेव्हा लोकांचा विरोध झुगारून गांधीजी म्हणाले होते, "ह्या जोडप्याला तुम्ही इथे राहू देणार नसाल, तर मी गावाबाहेरच्या महारवाड्यातील झोपडीत जाऊन राहीन."[५] ह्या प्रसंगातून गांधीजींचे व्यक्तिमत्त्व अधिक प्रखर होताना दिसते. गांधीजींचा सर्वांशी पत्रव्यवहार होई. कितीही कामाची घाई असली तरी ते दोन ओळीचे पत्र पाठवत. गांधीजी आझाद मैदानावर बंगालमध्ये चाललेल्या सशस्त्र प्रयत्नांचा निषेध करत म्हणाले, "आपल्या ख्रिश्चन शासकांनी आपल्याला दिलेली नाताळाची भेट आहे ती ! आशेचा एखादा अंधुकसा तंतूदेखील आहे. असे मला वाटले तर त्याच्या आधाराने मी शांतीचा शोध घेत जाईन. पण जर माझा नाईलाज झाला तर मी तुम्हा सर्वांना आत्मयज्ञासाठी निमंत्रण देईन. गेल्या वर्षी आपण लाठ्याकाठ्यांना तोंड दिले पण पुढच्या लढ्याच्या वेळी तोफा, बंदुका, आग आपल्याला सामोऱ्या येतील यात शंका नाही, हरकत नाही. तशीच वेळ आली तर लाखो सुपुत्र आणि सुकन्या हसत हसत मृत्यूला भेटायला जातील. याबद्दलही माझ्या मनात तिळमात्र शंका नाही. इंग्लंडमधल्या इंग्लिश मित्रांनाही मी हेच सांगितले आहे."[६] या संदर्भातून गांधीजींचा प्रखर राष्ट्रवाद स्पष्ट होतोच, पण त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील काही

राष्ट्रवादी विचार स्पष्ट होतात.

गांधीजी सत्याग्रहाविषयी ठाम होते. व्हाइसरॉयलाही त्यांनी याविषयी प्रत्युत्तर दिले होते की, 'सत्याग्रहाचे जे काही परिणाम भोगावे लागतील, ते भोगायला देश तयार आहे. सत्याग्रहाचे एक खास उदाहरण म्हणजे गांधीजींनी दोन विलायती घड्याळे मागावली होती. परकिय मालांवर बहिष्कार हा मंत्र गांधीजींनीच दिला होता. पण, गांधीजींनीच विलायती घड्याळे मागविली याचे आश्चर्य सर्वांनाच होते. पण, त्यांनी ती घड्याळे इंग्लंड आणि युरोपात बरोबर राहणाऱ्या दोघा डिटेक्टिव्हांसाठी भेट पाठवली होती. कारण, त्या दोघांचा सत्याग्रहात सहभाग होता. हा विचार गांधीजींच्या मनाचा वेध घेणारा ठरतो. म्हणूनच सर्वजण त्यांना विलक्षण माणूस म्हणत. अनेक विचारांतून राष्ट्रवादी भावना व्यक्त करणारे गांधीजी प्रत्यक्षात राष्ट्रवादी होते हे यावरून स्पष्ट होते. गांधीजींचे खरे शस्त्र म्हणजे उपवास. बापूंनी ३० तारखेपासून हरिजनांच्या विभक्त मतदारसंघाविरुद्ध आमरण उपोषण निश्चित केले होते. कारण गांधीजी हरिजनांचे पूर्ण पक्षपाती होते याचे उदाहरण म्हणजे, ''एका हरिजनापायी कस्तुरबांचा हात पकडून रात्रीच्या वेळी आफ्रिकेसारख्या परदेशात ते त्यांना घराबाहेर काढायला तयार झाले होते.'' हा प्रसंग आपल्या 'सत्याच्या प्रयोगात' नोंदवून ठेवलेला दिसतो. यावरून गांधीजींचे आदर्शवादी व्यक्तिमत्त्व दिसून येते की, त्यांना आपल्या नात्यापेक्षा समाजाच्या उद्धाराची किती तळमळ होती. हेच अधिक प्रखरपणे जाणवते. कारण त्यांना वाटत होते की, जर हरिजनांना विभक्त मतदार संघ मिळाला, तर त्यांच्या उन्नत्तीचे मार्ग थांबतील. म्हणूनच त्यांनी बजावून सांगितले होते, 'हरिजनांना विभक्त मतदार संघ मिळाले तर मी प्राणपणाने त्याविरुद्ध लढा देईन.' अशा थोर महात्म्याचे विचार म्हणजे राष्ट्रनिर्माणात संजीवनी ओतण्यासारखे वाटतात. हाच खरा राष्ट्रवाद म्हणता येईल.

आमरण उपोषणाने गांधीजींची तब्येत खालावत होती. शेवटी तेच जिंकले. आंबेडकरांनीही त्यांचे मत मानले होते. गांधीजीही स्वत:ला 'मी आंबेडकरांच्या जातीचा

आहे' म्हणत. आणि स्वत:ची जातही त्यांनी कोर्टदरबारी 'हरिजन' लिहून टाकली होती. यातच त्यांचे समाजाला आदर्शवादी व्यक्तिमत्त्व दिसते. गांधीजी वेळोवेळी उपोषणाचे शस्त्र उलचत होते. सार्वजनिक सत्याग्रहापेक्षा त्यांनी वैयक्तिक सत्याग्रह अंगीकारला होता. याचे वेगवेगळ्या वर्तमानपत्रात रोजच वर्णन येत होते. उपवासामुळे त्यांचे शरीर क्षीण झाले होते. गांधीजी नेहमीच रेल्वेच्या तिसऱ्या वर्गाने (डब्याने) प्रवास करत. त्यांना कोणी याविषयी विचारले तर ते म्हणत, रेल्वेला चौथा वर्गच नाही, म्हणून मी तिसऱ्या वर्गाने प्रवास करतो. गांधीजी देशसेवा करता करता आपल्या स्वत:च्या मुलालाही पितृप्रेम देऊ शकत नव्हते. हरिलालला ते म्हणाले होते, 'माझ्याजवळ राहायला ये ना !' यातूनच त्यांच्या पितृत्वाची व्यक्तिमत्त्वाची जाण होताना दिसते. एकदा सभेत एका स्त्रीने गांधीजींना विचारले होते, 'तुम्ही आम्हाला सांगता की, 'काम करा ! कसले काम देणारे तुम्ही ? घरची कष्टाची कामे आणि तुमचा चरखा ?' या प्रश्नाला गांधीजींनी उत्तर दिले ते म्हणजे - ''तुझ्या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी मीही जर तुझ्यासारखीच स्त्री होऊन येऊ शकलो असतो, तर माझे म्हणणे चांगल्या रीतीने पटवून देवू शकलो असतो ! स्त्रीचे ते नैतिक सामर्थ्य देवाने त्यासाठी मला द्यावे. नाहीतर अशा स्त्रीला आमच्याकडे पाठवावे अशी प्रार्थना करतो मी !''[७] दुसऱ्या महायुद्धात इंग्लंडला मदत करावी पण ती बिनशर्त करायला हवी, असे गांधीजींना वाटत होते. शासनकर्त्यांच्या मुस्कटदाबी विरुद्ध आमरण उपोषण करावे असे गांधीजींना वाटत होते. पण त्यांनी कायदेभंग करणारे शस्त्र उपसले होते. यातच त्यांच्या राष्ट्रवादी भावना जाणवतात. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यास काय करावे, यासाठी गांधीजींचे विचार त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला शोभतील असे आहेत. 'गांधींना वाटत होते, भारत जर स्वतंत्र झाला तर त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी भारतीयांवर सोपवणे शक्य नाही.' भारताला जर खरे खुरे स्वातंत्र्य देण्याची ब्रिटिशांची इच्छा असेल तर त्यांनी पहिल्यांदा आपले सैन्य भारतातून काढावे व संरक्षणाची जबाबदारी भारताला पेलू द्यावी.

'मृणालिनी देसाई' यांनी गांधीजींचे व्यक्तिमत्त्व व्यक्त करताना कादंबरीमध्ये त्याविषयी नमूद केलेले दिसते की, ''गांधीजी 'असे' राजकारणी पुरुष नव्हते. शब्द फिरवून दाखवणारे मुत्सद्दी नव्हते. राजकारणात 'मान्य केलेले किंवा करवून घेतलेले असत्य म्हणजे 'सत्य' ही सत्याची व्याख्या त्यांना माहीत नव्हती. सर स्टॅफर्डसारखा 'सज्जन' माणूस भेटीसाठी आला. त्यांच्याशी ते मनमोकळेपणे बोलले. पण अंती ही जी फलश्रुती पाहिली त्याचवेळी त्यांनी निश्चय करून टाकला. ब्रिटिश सत्ता या देशातून नाहिशी व्हायला हवी. याला कोठलाही पर्याय नाही.' या बाबतीत तडजोडही होणे शक्य नाही. शक्य तेवढ्या लवकर त्यांनी तोच ठराव मांडला होता. पटवून दिला होता आणि तोच ठराव अखिल भारतीय समितीच्या खुल्या अधिवेशनात येणार होता.''[८] देशाला स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. हाच प्रखर राष्ट्रवाद गांधीजींच्या व्यक्तिमत्त्वातून दिसून येतो. स्वातंत्र्यापूर्वी गांधीजींच्या सहवासात लोक आपोआप येत होती. जिवंतपणीच त्यांना महात्मा ही पदवी मिळाली होती. म. गांधीजींचे मोठेपण संपूर्ण जगाला जाणवले होते. याच महात्म्याचे जीवन आदर्शमय असे होऊन जाते. जेव्हा बापूंच्यावरती वॉरंट होते त्याच दिवशी संध्याकाळी सभा होती. त्या दिवशी बापूंनी 'कस्तुरबा' यांना सभेला जाण्यास सांगितले. तेव्हाच बापूंचे असणारे राष्ट्रविषयक प्रेम दिसते.

इंग्रजांच्या विरोधी राष्ट्रवादी भावना जागवणारे गांधीजी वेळोवेळी आपल्या परीने लोकांना संदेश देत, त्यांना 'करू किंवा मरू' हा संदेश दिला होता. अनेक वेळा तुरुंगात वर्षेघालवावी लागली होती. कधी नातलगांचा दुरावा कधी स्वातंत्र्याचा ध्यास हे सर्व नकळत त्यांच्या आयुष्यात दिसत होते. जेव्हा कस्तुरबा गांधी, आजारी होत्या. तेव्हा त्यांचा अंत्यसमय जवळ येत होता, त्यावेळी गांधीजी तुरुंगातच होते. हा प्रसंग त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची छाप पाडतो. गांधीजी हे सिद्धांतवादी होते. कस्तुरबा गांधींच्या निधनानंतर गांधीजी तुरुंगातून सुटले, अशा महात्म्यासाठी करोडे माणसे हुरहुरत होती. तुरुंगामध्ये बापू मृत्युशी झगडत होते. अनेक रोगांना न जुमानता झगडत होते. आठ

ऑगस्टच्या भाषणात गांधीजी म्हणाले होते. ''१२५ वर्षे जगून या देशाची सेवा करण्याची मला उमेद आहे !'' हीच उमेद स्वातंत्र्याच्या जीवनात तेवत होती. म्हणूनच गांधीजींना सरकारने बिनशर्त सोडून दिले होते. गांधीजी म्हणतात,''असत्य किंवा हिंसा मला लेशमात्र खपत नाही. पण, कोणी काय केले याचा निवाडा मी यावेळी करू शकत नाही, इच्छितही नाही. आपण सत्य आणि अहिंसेचे पालन जितके चोख केले असेल त्या प्रमाणात आपल्याला निश्चित यश मिळेल यात मला शंका नाही.''[१] गांधीजींचे व्यक्तिमत्त्व झुंझार सेनापतीसारखे होते. बापूंच्याजवळ प्रेमळ छत्र होते. पण एक आजारी मनुष्य म्हणून मात्र, गांधीजी फार त्रासदायक 'दर्दी' होते ! खूप वय होऊनही त्या वयाच्या वर्षाइतके देखील वजन त्या शरीराचे राहिलेले नव्हते. अशक्तपणा शरीरात होता. त्यांच्या देखभालीसाठी तज्ञ डॉक्टर असूनही त्याचा काही उपयोग नव्हता. गरिबीला परवडणारे देशी औषधच असावे. कारण, याच 'औषधांवर' गांधीजींची श्रद्धा होती. देशी इलाज करवून घेणेच त्यांना अधिक पसंत होते. अशा गुणांनी परिपूर्ण व्यक्तिमत्त्व हेच त्यांचे खास वैशिष्ट्य ठरते.

स्वतंत्र राष्ट्रांचा मुद्दा समोर घेऊन जीना 'मुस्लिमांसाठी' स्वतंत्र पाकिस्तान राष्ट्र मागत होते. सर्वांना असे वाटत होते की, गांधीजी पाकिस्तान देऊन टाकणार हा विचार जोर धरू पहात होता. जीना व गांधी भेट होणार होती. गांधीजी कमालीचे सहिष्णू असल्यामुळे जिनांनी मांडलेली बाजू समजून घेण्याचा प्रयत्न ते करत होते. जेथे मुसलमानांचे बहुमत असेल तेथे स्वायत्त राज्य देण्यास त्यांची हरकत नव्हती. त्यांचा खरा राष्ट्रवाद म्हणजे, ''कोठेही शंभर टक्के एकाच जातीची वस्ती नाही. तेव्हा त्या जागी राहणाऱ्या सर्वांचेच मत घेतले पाहिजे ! आणि दुसरे म्हणजे सर्व मुसलमानांचे देखील मत पाकिस्तानच्याच बाजूला पडेल असे सांगवत नाही आणि त्यातून प्रजेला हवे असेल तर पाकिस्तान दिले जाईल. पण हे विभाजन आपण कुटुंबातून दोन भाऊ वेगळे निघतात तसे प्रेमाने आणि आपसात समजून करू. ब्रिटिशांना त्या आधी आपण दूर करू, आपले

विभाजन व्हायचे असेल ते त्यांच्या हाताने नको. आपले आपण काय वाटेल ते करू.''[१०] गांधीजी कायदेपंडित असल्यामुळे ते एका जमातीचे वा एका राष्ट्राचे नव्हते. म्हणूनच त्यांनी आपल्या प्रवचनात हिंदू - मुस्लिम ऐक्यासाठी बरेच विचार मांडलेले दिसतात. गांधीजींना स्वातंत्र्य सरळ मार्गाने हवे होते. त्यांना 'सनदशीर' मार्ग मान्य नव्हता. ''पाऊणशे वर्षांच्या प्रयत्नाने मी तुमचा 'बापू' झालो. उरलेली 'पन्नास' मला अभ्यास करायचाय 'बा' व्हायचा. 'बा' गेली त्या रात्रीपासून ही पुढची वर्षे तिला दिलीत मी'' यातून गांधींचा कस्तुरबांविषयी असणारा ऋणानुबंध स्पष्ट होतोच आणि खरे गांधीजी दिसून येतात. गांधीजींच्या कार्याचा गौरव करताना नेताजी सुभाषचंद्र बोस म्हणतात, ''१९२० मध्ये गांधीजी आपले जगावेगळे शस्त्र घेऊन भारतात आले नसते तर आम्ही अजूनही साम्राज्यवाद्यांच्या बुटांच्या टाचेखाली चिरडलो जात, रक्त ओकीत जीवाची भीक मागत जगत असतो ! गांधीजींनी आम्हाला राष्ट्रीय स्वाभिमान म्हणजे काय ते शिकवले. आत्मविश्वास निर्माण केला. आम्हाला निर्भय बनवले. आजच्या क्रांतीचा हा दीप त्यांनीच चेतवलेला आहे. दूर परदेशात, जातपात, भाषा, प्रांत कसलाही भेदभाव आज आमच्यात उरलेला नाही. एका भारताचे आम्ही संताने ही भावना जागवली महात्मा गांधीनी''[११] महात्मा गांधीजींचे महात्म्य सर्वसामान्यांना कळले होते आणि नेताजीसारख्या महान पुरुषालाही गांधीजींचे आदर्शवादी व्यक्तिमत्त्व जाणवले होते. म्हणूनच महात्मा गांधीजींविषयी गौरवोद्‌गार त्यांनी काढले. गांधीजींचे दुसऱ्या महायुद्धातील 'अणुबॉम्ब' विषयींचे विचार प्रखर राष्ट्रवादी भावना व्यक्त करतात. गांधीजी वयाने जास्त होते. पण शरीराने थकलेले नव्हते. याचे उदाहरण म्हणजे 'केझी साहेबांना' ते म्हणाले होते, ''सदा पायाला चक्र बांधलेला मी, मी कसला थकतोय ?'' गांधीजींचा गुण म्हणजे ते नेहमी सर्वांचा मान राखत. त्यांचे मार्गदर्शनही मोलाचे होते. त्यांना नेहमी वाटे की, 'जर भारताला स्वातंत्र्य मिळाले तर ही जनता गैरशिस्त, भोळी, भाबडी, आळशी प्रजा तिला ते पेलल का ? कळेल का ? पचेल का ? याची त्यांना खंत

वाटत राहायची. अशा प्रकारे त्यांच्या राष्ट्रवादी भावना नेहमीच प्रखर वाटतात.

स्वातंत्र्यासाठी बापू वनवन भटकत असत, संपूर्ण देशभर जनजागृती करत असत, लोकांना एकत्र करत असत. देशाच्या फाळणीवेळी गांधीजी म्हणाले होते, ''देशाची फाळणी करायची असली तर ती माझ्या मृतदेहावर पावले टाकून करावी लागेल.''[१२] सततच्या व्यापामुळे गांधीजी तब्येतीने वाळले होते. चेहऱ्यावरती सुरकुत्या होत्या. डोळ्यांतल्या हास्यामागे विषादाची गाढ छाया होती. गांधीजी स्वत: आपल्या प्रार्थनेत अगदी एकाग्रचित्त होत. गांधीजी व जिना यांनी फाळणीच्या ठरावावर सह्या करून शिक्कामोर्तब केले. तेव्हापासूनच खऱ्या आर्थाने गांधीजी विचाराने, मनाने, शरीराने खालावत गेले. फाळणी ही खूप भयानक होती. काळजाला भिडणारी अशी होती. याचाच परिणाम की, बापूंचे सतत 'मौन' असे. लोकांना हे मौन नको होते. कारण यामुळे प्रश्न गंभीर होणार होता. पेपरमध्ये कोठेतरी येईल की, बापूंनी 'मौन' सोडले, पण हे दुर्मिळच होते. बापूंना नेहमी वाटे, 'जर पाकिस्तान निर्माण झाले तर, तेथील अल्पसंख्यांक हिंदूमध्ये आपण असावे' अशी त्यांची धारणा होती. महात्मा गांधीजींच्यावरती खुनी हल्ला होण्याअगोदर ते म्हणाले होते, ''पोरांनो एक ध्यानात ठेवा, जर मी आजारी पडून, निष्क्रिय, खितपत मेलो तर जगाला आवडो वा न आवडो - तुम्ही सांगा की, या माणसाला लोकांनी उगीच महात्मा 'बनवलं' तो महात्मा नव्हता. सामान्य पुरुष होता. आणि परवा बॉम्ब टाकला तसा कोणी नीट नेम धरून प्रयत्न केला तर हसतमुखानं रामाचं नाव घेत त्याला आशिर्वाद देऊन गेलो. तरच तुम्ही माझं नेहमी ऐकलंत, माझ्यावर इतकं प्रेम केलंत, त्याला मी लायक होतो असं समजा.''[१३] यावरून महात्मा गांधीजींचे जीवनविषयक तत्त्वज्ञान कळतेच पण, आदर्शवादी व्यक्तिमत्त्व प्रखरतेने जाणवते. फाळणीच्या घटनेनंतर अवघ्या काही दिवसांत 'बिला हाऊस' मध्ये ३० जानेवारी १९४८ रोजी राजकीय प्रतिस्पर्धेतून गांधीजींवर अज्ञात व्यक्तीने गोळ्या झाडल्या. या घटनेमुळे संपूर्ण देशच हादरला व हे आदर्शवादी व्यक्तिमत्त्व आपल्या

राष्ट्रवादी विचारांची पेरणी करून काळाच्या पडद्याआड अनंत काळासाठी लुप्त झाले.

'मृणालिनी देसाई' यांची 'पुत्र मानवाचा' ही कादंबरी गांधीजींचे अल्पचरित्र व्यक्त करणारी कादंबरी आहे. यामध्ये गांधीजी आदर्शवादी व्यक्तिमत्त्वाचे होते याचाच प्रत्यय येतो व त्यांचा खरा राष्ट्रवाद वाचकांसमोर येतो. मराठी वाङ्मयाच्या दृष्टीने ही कादंबरी वाचकांच्या मनावर प्रभाव पाडण्यात यशस्वी होते. यामध्ये कोणतीही शंका नाही.

**ब) महात्मा गांधींचे समकालीन सहकारी व त्यांचे कार्य :-**

'पुत्र मानवाचा' या कादंबरीचे चरित्र नायक म्हणजे 'महात्मा गांधीजी' हे होय. 'मृणालिनी देसाई' यांनी गांधीचरित्राबरोबर नकळत म. गांधीजी यांच्या समकालीन सहकार्याचे कार्यही थोडक्यात सांगितले आहे. देशसेवा ज्यांचा धर्म होता. अशा काही मोजक्याच व्यक्ती होत्या. यामध्ये महात्मा गांधीजी अग्रणी होते. पण त्यांच्याच कार्याला मानणारे व देशाला सर्वस्व अर्पण करणाऱ्या काही व्यक्ती होत्या की ज्यांच्या कार्याचा उल्लेख केला नाही तर इतिहासाला महत्त्व राहणार नाही. याचाच प्रत्यय आपणाला 'पुत्र मानवाचा' या कादंबरीत येताना दिसतो. गांधी चरित्राबरोबर काही असे त्यांचे समकालीन सहकारी आहेत की, त्यांचे कार्य नजरेआड करून जमणार नाही, अशी व्यक्तिमत्त्वे पुढीलप्रमाणे -

१) कस्तुरबा गांधी

२) ॲनी बेझंट

३) नेताजी सुभाषचंद्र बोस

४) पंडित जवाहरलाल नेहरू

५) मि. ॲड्र्यूज - दीनबंधू

६) बॅ. जिना

७) लालाजी

१) कस्तुरबा गांधी :-

"मोठ्या माणसाची पत्नी होणे हे भाग्याचे असते, त्यापेक्षाही दिव्याचेच असते. राष्ट्रपिता महात्मा गांधी या महान युगपुरुषाची पत्नी होण्याचे नुसते भाग्यच कस्तुरबा गांधी यांना लाभले नाही तर सर्वार्थाने त्या त्यांच्या अर्धांगिनी होऊन जगल्या. पोरबंदर येथे ११ एप्रिल १८६९ रोजी कस्तुरबांचा जन्म झाला. त्यांच्या जन्माची अचूक नोंद उपलब्ध नसली तरी ११ एप्रिल ही त्यांची जन्मतारीख मानली जाते. कस्तुरबांचे पूर्वाश्रमीचे नाव कस्तुर गोकलदास कपाडिया. त्यांचे वय अवघे सात असताना मोहनदास करमचंद गांधी यांच्याशी त्यावेळच्या प्रथेप्रमाणे त्यांचा 'बालविवाह' झाला. बालपणापासून ते अखेरपर्यंत कस्तुरबांनी महात्माजींना सावलीसारखी साथ दिली. महात्मा गांधी जेव्हा साऊथ आफ्रिकेत होते व तेथे त्यांनी आंदोलन केले त्यावेळी कस्तुरबांनीही त्यांचेबरोबर तुरुंगवास पत्करला. पुढे भारतात आल्यावर प्रत्येक चळवळीत, सत्याग्रहात कस्तुरबांचा वैचारिक क्रियाशिल सहभाग असे. त्यांनी अनेक वेळा तुरुंगवास पत्करला. साबरमती आश्रमाचे काम तर त्यांनी केलेच. याशिवाय असहकार चळवळीत महिलांनी सहभागी व्हावे म्हणून दौरे केले. महिलांचे जागरण केले. सरकारी मालकीच्या दारू दुकानांसमोर निदर्शने करण्याचा असहकार चळवळीतला जो कार्यक्रम होता त्याचे नेतृत्त्व पुरुषांपेक्षा महिलांनी करावे असा कस्तुरबांचा आग्रह होता व त्याप्रमाणे त्यांनी केलेल्या प्रयत्नांना यशही आले. कस्तुरबा या मूलतः अत्यंत शांत स्वभावाच्या होत्या. कुठलाही गाजावाजा न करता कर्तव्य भावनेने काम करण्याची त्यांची सवय होती. प्रत्येक कठीण प्रसंगात स्वतः कष्ट सोसून आणि मानसिक त्रास सहन करूनही कस्तुरबा महात्माजींच्या चळवळीत सहभागी असत. अहिंसेच्या तत्त्वावर आधारीत ज्या गांधीजींच्या चळवळीचे संपूर्ण जगामध्ये स्वागत झाले ते अहिंसेचे तत्त्व कस्तुरबांनी महात्माजींना दिले. याचा महात्माजी आवर्जून उल्लेख करीत असत. एका अर्थाने कस्तुरबांनी संपूर्ण विश्वालाच एका महान तत्त्वाची देणगी दिली असे म्हणता



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

येईल. त्यांच्या निधनानंतर 'टाईम्स ऑफ इंडिया' ने संपादकीय मत लिहून कस्तुरबांचा थोरपणा वर्णन केला आहे. आपल्या पतीवर दुर्दम्य निष्ठा असलेल्या त्या महान महिला होत्या. सौम्य स्वभावामुळे जाहीर भाषण करण्याचा त्यांना संकोच वाटत असे. पण महात्माजींच्या जीवनात साठ वर्षे साथ देताना राजकीय, आंदोलक, निदर्शक आणि सत्याग्रही अशी प्रत्येक भूमिका त्यांनी पार पाडली. अत्यंत दयाळू अंत:करण असलेल्या शूर महिला असे त्यांचे वर्णन केले जाते. १९४२ च्या आंदोलनात महात्मा गांधी व कस्तुरबा गांधी यांना अटक करून आगाखान पॅलेसमध्ये स्थानबद्ध केले होते. तेथेच त्यांची प्रकृती खालावली व २२ फेब्रुवारी १९४४ रोजी त्यांनी महात्माजींच्या खांद्यावर डोके टेकवून त्यांनी अखेरचा श्वास घेतला.''[१४]

**२) डॉ. ॲनी बेझंट :-**

डॉ. ॲनी बेझंट यांचा जन्म १ ऑक्टोबर १८४७ रोजी इंग्लंडमध्ये झाला. त्यांचे जीवन मात्र फुलले ते भारतीय अध्यात्माने 'थिऑसॉफिकल सोसायटी' ही त्यांची संघटना. भारतीय तत्त्वज्ञान, संस्कृती व अध्यात्म यांचा त्यांनी सखोल अभ्यास केला. त्या भारतात 'अडयार' येथे येऊन राहिल्या. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातही त्या सहभागी झाल्या. १९१५ च्या कलकत्त्याच्या कॉंग्रेस अधिवेशनाचे अध्यक्षस्थान त्यांनी भूषविले होते.

त्यांचे वडिल विल्यम पेजवुड हे त्या ८-९ वर्षाच्या असतानाच वारले. त्यांचे पालनपोषण त्यांच्या मैत्रिणीने केले. 'रेव्हरंड फ्रँक' या प्रोटेस्टंट पंथाच्या धर्मगुरुशी त्यांचा विवाह झाला. त्यांना दोन मुले होती. नंतर पती - पत्नीत दुरावा होऊन घटस्फोट झाला. नंतर त्या आईकडे राहण्यास गेल्या. ॲनी बेजंट यांची अज्ञेयवादी विचारवंत 'चार्ल्स ब्रॅडला' यांच्याशी गाठ पडली. त्या स्त्री सुधारणावादी होत्या. ॲनी बेझंट यांनी 'ब्रॅडला' यांच्या 'नॅशनल रिफॉर्मर'मध्ये सहसंपादिका या नात्याने अनेक लेख लिहिले. ॲनी बेझंट यांची 'मॅडम हेलेना ब्लाव्हॅटस्की' यांच्याशी भेट झाली. त्या 'थिऑसॉफिकल

सोसायटीच्या' अध्यक्षा होत्या. त्यांचा 'सीक्रेट डॉक्ट्रिन' हा ग्रंथ ॲनीने वाचला. ॲनी बेझंट यांचा असा विश्वास होता की, 'जगाचा सांभाळ करणारी एक अदृश्य शक्ती आहे व ती सदैव सावध आहे.' १८९३ साली त्या 'अज्ञेयवादी' विचार प्रणालीच्या प्रचारासाठी भारतात आल्या. त्यांना भारताविषयी आदर होता. त्या स्वत:ला 'जन्माने ख्रिश्चन व मनाने हिंदू' अशा म्हणत. 'पुत्र मानवाचा' या कादंबरीत त्यांचे कार्य समजत नसले तरी त्यांचे विचार मौलिक वाटतात, उदा. " लोकांचा जमाव एकदा का धुंद झाला की, त्याच्यावर कोणाचाही काबू राहणार नाही. तो वणव्यासारखा पसरत जाईल. जाळपोळ करील. आपल्याच पायावर धोंडा पाडून घेईल. कायदा आणि सुव्यवस्था धुळीला मिळवील आणि मग आपला धाक बसावा म्हणून शासनकर्ते त्यांचा धुव्वा उडवतील."[१५] जालीयनवाला बाग हत्याकांडाचे दाहक रुप पाहण्यासाठी त्या प्रत्यक्षात घडलेल्या ठिकाणी गेल्या होत्या. तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावरती ते घाव स्पष्ट जाणवत होते.

डॉ. ॲनी बेझंट या भारताच्या स्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्या होत्या. टिळकांप्रमाणेच त्यांनी 'होमरुल' आंदोलन उभारले. त्यांनी संपूर्ण जीवन भारतात घालवले. 'जे. कृष्णमूर्तींना' त्यांनी आपला मानसपुत्र मानले. भारतीय संस्कृतीचा त्यांनी गाढा अभ्यास केला. शिक्षण, समाजसुधारणा, स्वतंत्रता आंदोलनात त्यांनी भाग घेतला व २० सप्टेंबर १९३३ रोजी या जगाचा निरोप घेतला.

**३) नेताजी सुभाषचंद्र बोस :-**

सुभाषबाबूंचा जन्म 'कटक' येथील नामवंत वकील जानकीनाथ बोस व प्रभावतीदेवी यांच्या पोटी २३ जानेवारी १८९७ रोजी झाला. वयाच्या पंधराव्या वर्षी 'रामकृष्ण परमहंस' - विवेकानंद त्यांच्या जीवनात आले. सतराव्या वर्षी सद्गुरुंच्या शोधासाठी गिरीकंदरात हिमालयात वणवण भटकत राहिले. इंग्रजांच्या उर्मटपणामुळे त्यांच्या वडिलांनी नोकरी सोडली. आय. सी. एस. होण्यासाठी ते इंग्लंडला 'केंब्रिज विद्यापीठात' गेले व पदवीधर होऊन भारतात आले. "१९२१ साली जालियनवाला

हत्याकांडाने संतप्त झाल्यामुळे इंग्रजांची नोकरी न करता मातृभूमी स्वतंत्र करण्याचा विडा त्यांनी उचलला. गांधीजींच्या बरोबर असहकाराचे आंदोलन सुरू केले. गांधीजींनी सुभाषबाबूंना डॉ. चित्तरंजन दास यांच्याकडे पाठविले.'' बंगाली युवकांचा कंठमणी, बॅरिस्टरफर्डा वक्ता, देशभक्त असा विद्वान गुरु' हिमालयात मिळाला नव्हता तो गांधीजींनी दिला. दोघांची कारागृहातच मैत्री जमली, गुरुशिष्याचे नाते तयार झाले. सुभाषबाबूंविषयी युवकांना आकर्षण होते. रेडिओवर त्यांचे भाषण ऐकण्यास सर्वजण उत्सुक असत. बर्लिनच्या रेडिओवरून एकदा ते म्हणाले होते, ''मी काही नाझींचे वकीपत्र घेतलेले नाही. ते माझे कामही नाही. माझा संबंध फक्त भारताशी आहे. ब्रिटिशशाहीवाद नेस्तनाबूत होईपर्यंत माझा देश स्वतंत्र होणे शक्य नाही हे आम्ही आता ओळखले पाहिजे. ब्रिटिश प्रचारक मला भारताचा वैरी ठरवू पाहात आहेत पण माझे देशबांधव मला ओळखतात. माझ्या देशप्रेमाची आणि प्रामाणिकपणाची साक्ष पटवण्यासाठी प्रमाणपत्रे गोळा करण्याची मला जरूर नाही, माझे आजवरचे आयुष्य हेच माझं प्रमाणपत्र आहे.''[१६] सुभाषबाबू प्रांतिक परिषदेचे अध्यक्ष होते. एका दहशतवाद्याचा सत्कार केल्याच्या आरोपावरून इंग्रजांनी सुभाषबाबूंना मंडालेच्या तुरुंगात पाठविले. प्रकृती बिघडल्यामुळे १९२७ साली त्यांना मुक्त केले.

१९३३ ते १९३६ मध्ये युरोपमध्ये जाऊन ऑस्ट्रियात व्हिएन्नाला राहिले. हिटलर, मुसोलिनी, इमॉन डी. व्हॅलेरांना भेटले युरोपच्या राजकारणाचा अभ्यास केला. कॉंग्रेसचे अध्यक्ष निवडले गेले; परंतु गांधीजींना ते मान्य नव्हते. म्हणून त्यांनी राजीनामा दिला. फॉरवर्ड ब्लॉकची लढाऊ आघाडी उघडली. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी इंग्रजांच्या हातावर तुरी देऊन जपान जर्मनीतील सहकाऱ्यांच्या मदतीने 'आझाद हिंद सेना' काढली. आशकानच्या डोंगरात त्या सेनेच्या फौजा घुसल्या पण ॲटमबॉम्बने युद्धाचे पारडे फिरले. जपान - जर्मनांनी पराभव स्वीकारला. १८ ऑगस्ट १९४५ साली तैवान विमानतळावरून प्रयाण करीत असताना भडकत्या ज्वालांच्या प्रकाशात त्यांची प्राणज्योत विलिन झाली

आणि सुभाषबाबूंनी घेतलेली शपथ म्हणजे - ''परमेश्वराचे नाव घेऊन मी ही पवित्र शपथ घेतो. हिंद आणि माझे अडतीस करोड हिंदवी बांधव यांच्या मुक्ततेसाठी मी, सुभाषचंद्र बोस, माझ्या जीवनाच्या अंतिम क्षणापर्यंत झटत राहीन''[१७] हे विधान सार्थक झाल्यासारखे वाटते.

**४) पंडित जवाहरलाल नेहरु :-**

पंडित मोतीलाल नेहरु यांचे पुत्र म्हणजे पंडित जवाहरलाल नेहरु होय. त्यांचा जन्म १४ नोव्हेंबर १८८९ मध्ये झाला. लहानपणापासून राजपुत्राचे जीवन जगणारे नेहरू लहानपणी एकाकीच होते. वैभवात वनवास भोगत होते. पुढे कारावास भोगू लागले. ॲनी बेझंटचे अनुयायी 'फर्डिनंड ब्रुक्स' हे जवाहरलालजींचे व्यासंगी व निष्णात गुरु होते. बालपणापासूनच विविध विषयांवरचे ग्रंथ त्यांनी वाचले. १९१६ साली 'बॅरिस्टर' होऊन भारतात आले. १९२२ साली कमलादेवींशी त्यांचा विवाह झाला.

भारताचा एक सशक्त व खंबीर नेता. जगातील शांततेचा प्रवक्ता अशीच इतिहासाला त्यांची ओळख राहील. या त्यांच्या शांततावादी धोरणामुळे जगातील राजकारणास नैतिक पाठिंबा मिळाला. सर्वधर्मसमभाव व जगातील देशांतील अंतर्गत झगड्यातील अलिप्ततावाद यामुळे भारताची नैतिक, सांस्कृतिक बाजू जगात उंचावली. १९१६ पासून त्यांनी सातत्याने गांधीजींचा पाठपुरावा केला. आपल्या जीवनाची १७ वर्षेत्यांनी कारावासात घालविली. १९२९ साली ते कॉंग्रेस पक्षाचे अध्यक्ष झाले. युरोपच्या राजकारणात औद्योगिक क्रांतीने व कामगार क्रांतीने जे परिवर्तन घडवून आणले होते त्याचा त्यांनी सूक्ष्म अभ्यास केला होता. भारतासारख्या खंडप्राय देशात विकास घडवून आणण्यासाठी त्यांनी उदारमतवादी धोरण स्वीकारून जनशक्ती संघटित केली. मानवी शक्तीचा पुरेपूर उपयोग करून घेण्यासाठी शेती व ग्रामोद्योगांना प्राधान्य दिले. महात्मा गांधीजींच्या सत्य, अहिंसा या धोरणांचा त्यांनी सतत पाठपुरावा केला. ''पंडितजी स्वभावाने तापट, त्यांना हा उघड पक्षपात, ही मुस्कटदाबी सहन होत नव्हती. त्यांचे

आणि व्हॉइसरॉयचे क्षणभर जमण्यासारखे नव्हते. पण ज्यांच्या हाती राष्ट्राचे भवितव्य असते. त्यांच्या एका शब्दाने काळ फिरतो.''[१८] या संदर्भातून पंडितजींच्या स्वभावाचे वैशिष्ट्ये दिसून येते.''१९४७ साली भारत स्वतंत्र झाला. त्या स्वतंत्र देशाचे ते पहिले पंतप्रधान झाले. 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया', 'जगाचे ओझरते दर्शन' ही त्यांची पुस्तके जगभर गाजली. २७ मे १९६४ रोजी त्यांनी इहलोकाची यात्रा संपविली. तरी, 'अलिप्तवादाचा पुरस्कर्ता' ही जागतिक इतिहासातील त्यांची कीर्ती कायम आहे.''[१९]

**५) मि. अँड्र्यूज - (दीनबंधू) :-**

मि. अँड्र्यूज हे ब्रिटनचे रहिवाशी होते. त्यांचे वर्णन करताना 'मृणालिनी देसाई' म्हणतात, ''फुलगुलाबी वर्णाचा, सोनेरी केसांचा तो युरोपियन गृहस्थ, अंगावर मळके, जाडेभरडे कपडे, दाढी वाढलेली, पायांत फाटके बूट आणि सर्वांवर ताण म्हणजे एक्क्यात कसे बसावे ते नकळल्याने दोन्ही पाय खरचटले होते ! डोळ्यांत खट्याळ हसू लुकलुकत होते.''[२०] दीनबंधू हे गांधीजींचे सहकारी मित्र होते. त्यांनी गांधीजींच्या बरोबर अनेक कामे केली. त्यांच्या ओळखी इंग्रज अधिकाऱ्यांपर्यंत होत्या. दीनबंधूनी 'फिजीला' निळीच्या कामगारांविषयी लढा दिला व चंपारण्यातही गांधीजींच्या बरोबर सक्रिय सहभाग होता, असे त्यांचे कार्य असले तरी स्वातंत्र्याच्या लढ्यात त्यांचे कार्य डोळेझाक करून चालणार नाही.

**६) डॉ. महम्मदअली जिना :-**

हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य लढ्यात सक्रिय असणारे डॉ. जिना, शरीराने उंच, काटकुळे, हुशार आणि करारी होते. राजकारण करावे ते डॉ. जिनांनीच ! गांधीजींचा कारभार त्यांच्या मानाने गैरशिस्त वाटे अशा व्यक्तिमत्त्वाचे जिना होते. राष्ट्रीय वृत्तीचे, उदार मताचे, ज्यांना 'बेताज बादशहा' सारखी लोकप्रियता होती गांधीजींना नेहमी 'महात्माजी' असे मानाने म्हणणारे जिना त्यांनी 'स्वतंत्र' पाकिस्तानची मागणी केली

होती. त्यासाठी गांधीजी व जिना यांची सतत बोलणी होत होती. अनेक भेटीगाठी होत. जिना हे स्वत:च्या मतावर ठाम होते. जिना हे कायदे आझम असल्यामुळे त्यांना 'पाकिस्तान' कोणत्याही परिस्थितीत हवेच होते. जिना एकदा गांधीजींना म्हणाले होते, 'तुम्ही पाकिस्तानला मान्यता द्या. मी तुमच्या पाठिशी राहीन !'' या वक्तव्यावरूनच जिनांचा पाकिस्तानविषयी असणारा हट्ट दिसून येतो. त्यांना कुरतडलेला पाकिस्तान नको होता. पाकिस्तानच्या निर्मितीत डॉ. जिनांना एक अनन्यसाधारण महत्त्व असलेले दिसून येते.

डॉ. जिना जरी पाकिस्तान धार्जिणे होते तरीही त्यांनी हिंदुस्थान स्वतंत्र करण्यासाठी जो लढा दिला तो उल्लेखनीय आहे. हिंदुस्थान स्वतंत्र व्हावा परंतु; मुस्लिमांना स्वतंत्र राज्य मिळावे. या मताला चिकटून ते शेवटपर्यंत लढा देत होते. म्हणूनच ते स्वतंत्र पाकिस्तान निर्माण करू शकले.

**७) लालाजी (लाला लजपतराय) :-**

गांधीजींचे समकालीन सहकारी म्हणजे 'लालाजी' हे होय. लालाजींच्या कार्याला इतिहासात अनन्यसाधारण महत्त्व आहे. ते अत्यंत प्रेमळ, सुस्वभावी गृहस्थ होते, हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वामुळे जाणवून येते. 'निधड्या छातीचा' व्यक्ती अशी त्यांची ख्याती होती. त्यांनी इंग्रजांच्या विरोधात 'गोबॅक' च्या नाऱ्याचे प्रतिनिधित्व केले होते. इंग्रजांनी लाहोरच्या निषेधात्मक मिरवणुकीत लहानमोठ्यांवरती काठ्यांचे घाव घातले. त्याचवेळी लालाजींच्यावर लाठ्यांचे घाव पडले व ते बेशुद्ध झाले आणि नोव्हेंबरच्या ७ तारखेला त्यांना वीरमरण आले. याविषयीचा उल्लेख 'मृणालिनी देसाई' 'पुत्र मानवाचा' या कादंबरीत करताना म्हणतात, ''लाला लजपतराय, लाठीमाराने दुखावलेले लालाजी देवाघरी गेले होते. लालाजी गेले.... ते पुन्हा कधीही दिसणार नाहीत ! निधड्या छातीने धीरगंभीरपणे वाटेल तसल्या परिस्थितीशी झुंज देण्यासाठी आघाडीवर

आता ते नसतील.''[२१] लालाजी यांचे कार्य इतिहासाच्या दृष्टीने अत्यंत मोलाचे असे आहे म्हणूनच भारतवासीय या महान व्यक्तिचा गौरव करताना दिसून येतात.

**८) महात्मा गांधीजींचे इतर समकालीन सहकारी :-**

महात्मा गांधीजींनी ज्याप्रमाणे 'देशसेवा हीच ईश्वर सेवा' मानली, अशा महान व्यक्तिमत्त्वाच्या आसपास अनेक राष्ट्रपुरुष वावरत होते. अशा लोकांचे कार्य हिंदुस्थानच्या इतिहासात सतत अमरच राहणार आहे. यामध्ये अग्रणी 'लोकमान्य टिळक' हे आहेत. ते गरम रक्ताचे होते. उघड्या डोळ्यांनी अगदी पापणी देखील न हलवता सरळ वणव्यात उडी घेण्याचे धाडस त्यांच्यात होते. गांधीजींनाही त्यांच्या पुण्याचा प्रभाव माहित होता. डॉ. आंबेडकरांनी तर स्वतंत्र भारताची राज्यघटना लिहिण्याचे महान कार्य केले. अशा राष्ट्रपुरुषाने सतत आपल्या जातीबांधवांसाठी लढा दिला. म्हणूनच त्यांना 'भारतरत्न' ही उपाधी मिळाली. गांधीजींच्या समकालीन असणाऱ्यांमध्ये म्हणजे 'सरदार पटेल, राजेंद्रबाबू, खान अब्दुल गफारखान, दासबाबू, मोतीलाल नेहरू, रासबिहारी, महादेवभाई देसाई, मौलाना महंमदअली, गुरुदेव इ. अशा थोर व्यक्तींचा गौरव करावा तितका कमी वाटतो. कारण, देशाच्या स्वातंत्र्यासाठी या लोकांनी आपल्या सर्वस्वाचाही विचार केला नाही. अशी उदाहरणे इतिहासात नेहमीच मिळतात. पण थोर व्यक्ती जन्माला याव्या लागतात.

'पुत्र मानवाचा' या कादंबरीत मृणालिनी देसाई यांनी म. गांधीजींचे समकालीन व्यक्ती मांडताना काही इतर समकालीन व्यक्तिमत्त्व नकळतपणे मांडली आहेत. यामध्ये त्यांनी गांधींच्या समकालीन सहकाऱ्यांच्या कार्याचा उल्लेख आपल्या कादंबरीत केलेलाच आहे. त्यामुळेच ही कादंबरी अधिक विश्वसनीय वाटते.

**क) शाश्वत मूल्ये :-**

कोणत्याही व्यक्तीच्या अंगी मूल्ये बिंबवायची झाल्यास ती लहानपणापासूनच

नकळत संस्कारीत केली जातात. हीच मूल्ये व्यक्तीच्या अंगी चिरकाल टिकतात आणि त्यातील थोडीच त्याच्या जीवनाला आकार देतात. ''जी मूल्ये व्यक्तीचे जीवन सुखकर, आदर्शमय बनवतात व व्यक्तीच्या अंगी चिरकाल टिकतात आणि सत्य असतात. अशी मूल्ये म्हणजे शाश्वत मूल्ये होय.''

'पुत्र मानवाचा' या कादंबरीत 'मृणालिनी देसाई' यांनी गांधीवादी विचारांच्या माध्यमातून काही अशी शाश्वत मूल्ये आपल्यासमोर मांडली आहेत, तीच आजच्या काळात प्रत्येकाला मार्गदर्शक व दिशादर्शक वाटतात म्हणूनच या मूल्यांची चर्चा करताना गांधीजींच्या जीवनातून नकळत प्रगट झालेल्या मूल्यांची पोषकता 'पुत्र मानवाचा' या कादंबरीत दिसते.

'आज प्राथमिक वा माध्यमिक शाळेत काही मूल्ये रुजविण्यासाठी दैनंदिन परिपाठाचा अवलंब करावा लागतो. पण ही मूल्ये विद्यार्थ्यांच्यामध्ये कितपत उतरतात याचा विचार हा संशोधनपर विचार होऊ शकतो. आज समाजात अनेक माध्यमातून मूल्यांची घडण होत असते; परंतु सगळीच 'शाश्वत' स्वरुपाची नसतात. म्हणूनच आपण जर 'पुत्र मानवाचा' ही कादंबरी अभ्यासली तर यामध्ये गांधीजींच्या जीवनाचे दर्शन अलगदपणे होते. त्याचवेळी काही शाश्वत मूल्ये समोर येतात. याच मूल्यांचा आज कसा उपयोग होऊन मार्गदर्शक ठरतात. याचा विवेचनात्मक अभ्यास आपण करणारच आहोत. अशा मूल्यांची नितांत आवश्यकता जाणवते; परंतु अशी गरज पूर्ण करण्याचे काम करण्यात साहित्य, प्रसारमाध्यमे, चित्रपट, वर्तमानपत्रे नेहमीच अग्रेसर असतात. साहित्यातही अनेक वेळा मूल्ये एकवटलेली असतात. तीच मूल्ये शोधण्याचा संशोधकांचा प्रयत्न असतो.

महात्मा गांधीजी हे एक आदर्शवादी व अध्यात्मवादी असे महान पुरुष होते. त्यांना वाङ्मयाचा व्यासंग असल्यामुळे काही ग्रंथातील महान विचारांचा त्यांच्यावर प्रभाव होता. 'पुत्र मानवाचा' या कादंबरीतून 'मृणालिनी देसाई' गांधींच्या जीवनातील

मूल्यांचा वेध घेताना म्हणतात, 'गांधीजींची सत्यावर अविचल श्रद्धा होती. त्यांनी सत्याची जोपासना करताना अनेकांना आपलेसे केले होते. निवेदक हा गांधीवादी व्यक्तिमत्त्वाचा असून गांधीजींच्या सहवासात राहण्याचा प्रयत्न करतो. घरामध्येही गांधीमय वातावरण असल्यामुळे त्याला फारशी अडचण जाणवत नाही. विलायतेत शिक्षण घेऊन 'मातृभूमीत' कार्य करायचे असा मानस निवेदकाचा होता. वडिलांच्या मार्गदर्शनाने तो चंपारण्यातील खटल्याच्या जबान्या घेण्यासाठी जातो. तेथेच खऱ्या अर्थाने गांधीजींच्या व्यक्तिमत्त्वाचा परिचय होतो व गांधीजी किती 'लोकविलक्षण माणूस' होते हे दिसून येते. निवेदकाला गांधीजींच्या सत्याग्रहात जायचे होते. गांधीजी हे फकीर होते, म्हणून ते म्हणतात, ''घे हातात झोळी नि चल माझ्याबरोबर'' निवेदकही सर्वस्वाचा त्याग करण्यास तयार होतो. सत्याग्रहाविषयी गांधीजी म्हणतात, ''सत्याग्रह हा अहिंसात्मक पद्धतीने 'युद्ध' करण्याचा एक मार्ग आहे. सत्याग्रह या शब्दाचा अर्थच 'सत्याचा आग्रह' असा आहे. सत्याग्रहाद्वारे दुसऱ्याचे हृदयपरिवर्तन घडवून आणणे म्हणजे सत्याग्रह होय. अत्याचार करणाऱ्यापुढे मान वाकविणार नाही, पण त्याची मानही छाटणार नाही, असा निर्धार म्हणजेच सत्याग्रह होय. सत्याग्रह हे एक नैतिक अस्त्र आहे. समाजनिष्ठ मूल्ये घेऊन वाटचाल करणारे गांधीजी जेव्हा निवेदकाच्या घरी येतात तेव्हा त्यांचे स्वागत कुटुंबातील प्रत्येक सदस्य करतो. त्याच दिवशी गांधीजी त्या गावातील व्यक्तींसाठी संदेश देतात. याच दिवसापासून खऱ्या अर्थाने निवेदकाच्या विचारात व कार्यात बदल होतो. गांधीजी जेथे जातील तेथे अगत्याने उपस्थित राहण्याचा प्रयत्न निवेदक करतो. जीवनाच्या वाटचालीत 'स्नेहल' सारखी जीवनसाथी त्याला मिळते. गांधीजी निवेदकाला 'स्नेहल'शी एकनिष्ठ राहण्याचा संदेश देतात. हेच खरे शाश्वत मूल्य म्हणता येईल.

आजच्या समाजात सत्य काही प्रमाणात डळमळताना दिसते. पण, सत्याच्या माध्यमातून कितीही खडतर मार्ग सोपा करता येतो. गांधीजी सर्वसामान्य व्यक्तिमत्त्वाचे

होते; परंतु 'सत्याच्या' माध्यमातून ते आज 'महात्मा' या पदापर्यंत पोहोचले. गांधीजी नेहमी म्हणत, 'सहस्त्र सूर्य एकत्र केले तरीही सत्याची बरोबरी होणार नाही.' याच सत्याचा प्रत्यय 'पुत्र मानवाचा' या कादंबरीत येतो. ''त्रावणकोर संस्थानातल्या व्याकोन गावी अस्पृश्यांना रस्त्यावरून चालण्याची मनाई होती. गांधीजींच्या उपदेशाने प्रभावित झालेल्या काही तरुणांनी सत्याग्रह करायचे ठरवले. अस्पृश्यांच्या हातात हात घालून रस्त्यावरून चालत जायचा या सत्याग्रह्यांचा कार्यक्रम होता. गांधीजी त्याच भागात होते. सत्याग्रही तयार झाले. काही थोडे अस्पृश्य तरुणही तयार झाले.'' अशा विचारांचा प्रभाव सर्वच स्तरातील लोकांच्यात दिसत होता.

निवेदक गांधीजींच्या मार्गाने मार्गक्रमण करतच होते कारण, ''ते स्वत:ला सत्याचे नम्र उपासक, शोधक आणि दरिद्रीनारायणाचे सेवक मानीत. त्यांच्या मते सत्य हाच ईश्वर. मात्र हे सत्य वैज्ञानिक सत्याप्रमाणे केवलपणे बुद्धिगम्य नाही. ते अध्यात्मिक अनुभूतीच्या स्वरुपाचे पण भौतिक जीवनावर प्रभाव गाजविणारे आहे.''[२२] वेळोवेळी होणाऱ्या अधिवेशनात किंवा सत्याग्रहात त्यांचा सक्रिय सहभाग असल्यामुळे निवेदकाला अनेक वेळा तुरुंगवास भोगावा लागत होता. विनय, शफी, भाभी, निशा, दिद्मणी, दद्दाजी यांचीही देशसेवेची मूल्ये प्रखर असल्यामुळे गांधीजींना पोषक वातावरण प्रत्येक स्तरात निर्माण होत होते. सत्याग्रहासारखे खरे मूल्य शोधणे खूप अवघड आहे. कारण 'सत्याचा आग्रह' म्हणजे सत्य किंवा दुसऱ्याचे हृदयपरिवर्तन घडवून आणणे म्हणजे सत्य होय. अन्याय व दडपशाही आणि शोषण यांच्याविरुद्ध केलेला आत्मिक शक्तीचा वापर म्हणजे सत्याग्रह होय. ''सत्याग्रह हा मनुष्याचा जन्मसिद्ध हक्क आहे. तो व्यक्तीचा केवळ पवित्र असा अधिकारच नाही, तर ते एक पवित्र कर्तव्यसुद्धा आहे. जर सरकार जनतेच्या इच्छेचे प्रतिनिधित्व करीत नसेल आणि अन्यायी विश्वासघातकी लोकांना पाठिंबा देत असेल तर अशा सरकारच्या आज्ञा नाकारण्याचा अधिकार प्रत्येक व्यक्तीला आहे. अर्थात सर्व प्रकारचे कष्ट सहन करण्याची सत्याग्रहींची तयारी असली पाहिजे.

वेळप्रसंगी त्याला आत्मबलिदान करावे लागेल. तरी तशी त्याच्या मनाची तयारी असली पाहिजे. सत्याग्रहाने अंतिम विजय प्राप्त होतो. यदाकदाचित सत्याग्रहीचा मृत्यु झाला तर ते त्याच्या विजयाचे द्योतक ठरते. त्याच्या मृत्युनंतर हजारो लोक त्याच्या मार्गाचा स्वीकार करतात.''[२३] ह्याच मार्गाने संपूर्ण समाज महात्मा गांधीजींची मूल्ये आत्मसात करत होता व आजही करेल यात शंका नाही.

अनेक प्रसंगी गांधीजींच्या व्यक्तिमत्त्वाची छाप पडते. कोणताही संघर्ष त्यात ते सत्य शोधत होते. आपली राहणी, कार्य यात विसंगती निर्माण होऊ देत नव्हते. निवेदकाच्या आयुष्यात गांधीजींना खूप महत्त्व होते. स्वातंत्र्य संग्रामात शेवटपर्यंत झुंजत रहायचं एवढंच त्यांच्या आयुष्याचे फलित होते. अहिंसेबद्दल गांधीजी म्हणत, ''पृथ्वीच्या पाठीवरील वस्तुमात्राला व प्राणीमात्राला विचाराने, शब्दाने वा कृत्याने संभवणारी दुखापत टाळणे म्हणजे अहिंसा होय.'' गांधीजी वेळोवेळी ब्रिटिश साम्राज्याशी लढा देत होते; परंतु त्यांनी कोणत्याही हिंसेला आकार दिला नाही. कोणतीही गोष्ट हिंसेपेक्षा अहिंसेने साध्य होते. महात्मा गांधीजींनी वेळोवेळी अनेक चळवळी घडवून आणल्या. त्यांचा तो खडतर मार्ग 'मिठाच्या सत्याग्रहा'त प्रखरपणे दिसून येतो. ''मिठाचा सत्याग्रह करण्यासाठी अहमदाबादपासून दोनशे मैलावरचे समुद्र किनाऱ्यावरचे दांडी गाव निवडले गेले. १२ मार्चला गांधीजी आश्रमातून निघणार होते. त्यांच्याबरोबर त्यांनी ७९ स्वयंसेवक निवडले होते. बहुतेकजण आश्रमातले होते. सर्व प्रांतातले, सर्व वयोमानाचे लोक होते.''[२४] 'परिसाने लोखंडाचं सोनं व्हावं' तसे गांधीजींचे जीवन होते. म्हणूनच भोळ्याभाबड्या लोकांचे श्रद्धास्थान हे गांधीजी होते. हजारो कंठात 'वैष्णवजन तो तेणे कहिये जे पीड पराई जाणे रे' अशी भजने सतत घुमत, वक्तशीरपणा गांधीजींच्या जीवनाशी निगडीत होता. कस्तुरबा गांधी यांच्यावर याचा प्रभाव दिसत असे, ''त्या पसाऱ्यात देखील आलेल्या प्रत्येकाशी जिव्हाळ्याच्या चार दोन शब्दांची तरी देवाणघेवाण असेच.''[२५] गांधीजींच्या जीवनाचा प्रवास तसा खडतर म्हणावा लागेल. सत्याग्रहाच्या

मार्गाविषयी डॉ. राजेंद्रप्रसाद आपल्या भाषणात म्हणाले होते, "सत्याग्रहाचा मार्ग सरळ आणि स्पष्ट आहे. लाखो माणसे त्या एका मार्गाने पुढे जातील यात शंका नाही. आमच्या चुका होतील, एकदा, दोनदा अनेकदा पण अखेरीस आम्ही त्या मार्गाने यशोमंदिर गाठू." गेल्या काही वर्षात अनेक शूर देशभक्तांनी अपार त्याग केलेला आहे. बलिदान केले आहे. सर्वस्वावर पाणी सोडलेले आहे. 'राष्ट्र' त्याबद्दल कृतज्ञ आहे. मार्गात येणाऱ्या विघ्नांना आम्ही जुमानणार नाही. प्रलोभनांनी भुलणार नाही. आमच्या अभिनव संग्रमाकडे जगाचे डोळे आशेने लागले आहेत. याची आम्हाला सतत जाणीव राहील. अशा प्रकारची मूल्ये जरी आज जास्त प्रमाणात उपयोगात नसतील पण सत्याचा आग्रह करणारी मूल्ये शाश्वत वाटतात

'पुत्र मानवाचा' या कादंबरीत मृणालिनी देसाई यांनी गांधीजींचे जीवनदर्शन व्यक्त करताना काही प्रमाणात त्यांचे तत्त्वज्ञान प्रगट केले आहे. गांधीजींच्या जीवनाशी निगडीत काही मूल्यांचा विचार करत असताना गांधीजी हे एक व्यक्ती म्हणूनच समोर घ्यावे लागतात. कारण, एक व्यक्ती म्हणूनच मूल्यांची जाणीव करून घेता येऊ शकते. आज समाज कोणत्यातरी आदर्शाच्या मागे धावताना जाणवतो. महात्मा उपाधी मिळालेले गांधीजी हे तर संपूर्ण भारताचे आदर्शस्थान ठरतात. याच प्रेरणेने या कादंबरीचे लिखाण झालेले दिसून येते. आपल्या राष्ट्रीय मूल्यांची जोपासना 'पुत्र मानवाचा' या कादंबरीत मृणालिनी देसाई यांनी केलेली दिसून येते.

**इ) प्रभाव व परिणाम :-**

महान राष्ट्रपुरुषांच्या विचारात, आचरणात कोणतातरी असा एक धागा असतो की, जो समाजाच्या प्रत्येक स्तरात गोवला जातो. म्हणूनच त्यांच्या ह्या विचारांचे काही परिणाम दूरगामी असतात व त्याचा प्रभाव नकळतपणे समाजात जाणवून येतो. समाजाला राष्ट्रपुरुषाची खरी जाणीव होते, ती साहित्यातून, हे साहित्य प्रत्येक स्तरात प्रभावी माध्यम ठरत असते. काही कलाकृती अशा असतात की, त्या समाजाच्या

नसानसात भिनल्या जातात. अशीच कलाकृती म्हणजे 'पुत्र मानवाचा' ही कादंबरी होय. मृणालिनी देसाई यांनी गांधीजींचे जीवनदर्शन प्रगट करताना काही प्रसंगाच्या माध्यमातून वाचकाच्या मनावर प्रभाव पाडलेला दिसून येतो. गांधी चरित्र मांडताना, गांधीजींचे जीवनच एक प्रभावी माध्यम म्हणता येईल. कारण, त्यांच्या जीवनाच्या प्रत्येक घडामोडीत आदर्शवाद दिसून येतो. लहान वयातच त्यांनी प्रण केला होता की, 'मांसाहार, मद्य व परस्त्री यांना स्पर्श करणार नाही.' अशा काही गोष्टींचा प्रभाव जनमानसावर होऊन त्याचे दूरगामी परिणाम जाणवतात.

गांधीजींचे जीवन एका एका प्रसंगाच्या द्वारे तेजोमय झालेले दिसते. 'पुत्र मानवाचा' या कादंबरीत काही अशाच बाबी निवेदकाच्या निवेदनातून 'मृणालिनी देसाई' मांडतात. महात्मा गांधीजींच्या जीवनाचा त्यांच्या विचारांचा प्रभाव 'मृणालिनी देसाई' यांच्यावर झाला होता. याचे बोलके उदाहरण म्हणजे ''नाहीतर वयाच्या तिसऱ्या वाढदिवसाला शिवलेला सुंदर फ्रॉक त्यांनी परदेशी कपड्याच्या होळीत फेकला नसता.''[२६] गांधीजींनी आपल्या तत्त्वांना स्वीकारताना अनेक वेळा हरताळ पाळले. कायदेभंग केले. त्यांनी 'सत्याग्रही' पत्र सरकारी परवान्याशिवाय प्रकाशित करून 'प्रेस ॲक्ट' मोडला. हीच त्यांच्या कायदेभंगाची खरी सुरुवात ठरली. त्याचवेळी त्यांना दिल्लीत पाय ठेवण्यापूर्वीच मनाई हुकूम बजावण्यात आला व गांधीजींना अटक झाल्याची बातमी वणव्यासारखी संपूर्ण देशभर पसरली. याचाच परिणाम म्हणजे, ''लोकांचा जमाव आरडाओरडा करीत पोलीस चौकीच्या आणि आजूबाजूच्या घरांच्या देखील खिडक्यांवर दगडफेक करीत होता. पोलिसांशी हातघाईवर येत होता. हे दृश्य पाहून बापूंच्या फिकट पडलेल्या चेहऱ्यावर निराशा दाटली. दु:खाने डोळे खोल गेले. भव्य कपाळावर काळजीच्या भाराने सुरकुत्या पडल्या. ते सारी शक्ती एकवटून सांगू लागले, पण त्या गोंधळात त्यांचा आवाज उमटतदेखील नव्हता.''[२७] महात्मा गांधीजींना मानणारा समाज प्रत्येक स्तरात होता. याचाच हा प्रभाव दिसून येतो की, प्रत्यक्षात गांधीजींच्या अटकेचे

पडसाद व त्याचे परिणाम किती भयंकर आहेत. गांधींनी सत्याग्रहाची सुरुवात केल्यापासून त्यांचा लोकांवर प्रभाव जाणवत होता. अहमदाबादमध्येही खूप मोठी सभा झाली व त्यात हजारो माणसांनी एकमुखाने 'स्वराज्याची' मागणी केली. अनेक लोक म्हणू लागले, 'साहेबांचे राज्य गेले, आता बापूंचे राज्य आले' असा जयनाद रस्तोरस्ती होऊ लागला. पोलिसांना जीव घेऊन पळायची वेळ आली होती. याचाच परिणाम असा झाला की, 'पाहणी करायला आलेले कलेक्टर चॅटफील्ड साहेब लोकांच्या तावडीत सापडले तेव्हा त्यांनी युक्ती केली व आपली हॅट काढून त्यांनी 'महात्मा गांधी की जय' अशी आरोळी ठोकली व आपला बचाव केला. गांधीजींच्या नावाचा लोकमानसावर एवढा प्रभाव होता की, प्रत्यक्षात इंग्रजांनाही तो जाणवत होता.

गांधीजींच्या जीवनात घडणारे प्रसंग, घटना यामुळे त्यांचे जीवन आदर्शमय होतेच पण, प्रत्यक्षात कादंबरीकारानेही वेळोवेळी त्या गोष्टी मांडल्या आहेत. म्हणूनच 'पुत्र मानवाचा' या कादंबरीचा प्रभाव व परिणाम यांची चर्चा करताना त्या कादंबरीतील विवेचनाचे संदर्भ घेणे गरजेचे वाटते. गांधीजींच्या कार्याचा एवढा ठसा उमटला होता की, लोक त्यांना नेहमीच विचारांचा केंद्रबिंदू मानत. ''बापू तुम्ही आमच्यांतून निघून गेलात त्यानंतर आपली शक्ती अजमावून पाहण्याचा प्रयत्न जगातल्या सर्वच मोठ्या राष्ट्रांनी केला. कोठल्यातरी निर्जन भागात, महासागराच्या पटावर अणुशस्त्रांची चाचणी घेऊन अब्जावधी नाण्यांचा धूर करून आपली विनाशक शक्ती त्यांनी अजमावली. अग्निबाण सोडून आकाशाला गवसणी घातली. अशावेळी मला नेहमी आठवत असत ते दोन दिवस. आम्ही तुमच्या अनुयायांनी, आपली शक्ती अजमावून पाहिली होती. ते दिवस.''[२८] निवेदकाला गांधीजींच्या कार्याची जाण होती याचाच प्रत्यय वरील संदर्भातून येतो. कादंबरीच्या अनुषंगाने विचार केल्यास असे दिसते की, 'पुत्र मानवाचा' ही कादंबरी गांधी जन्मशताब्दीच्या वर्षात प्रकट झाली. तेव्हापर्यंत सर्व समाजाला गांधीजींचा परिचय झाला होता. लोक त्यांना 'देवमाणूस' मानत.

''पारतंत्र्यात असणाऱ्या जनतेला स्वातंत्र्याची पहाट दाखविणारा हा एक विलक्षण माणूस होता.'' गांधीजींच्या कार्याची सर्वसामान्यांना जाणीव होती. म्हणूनच त्यांचे विचार समाजापुढे आणावेत असेच प्रत्येक शिक्षित तरुणांना वाटत होते. याच हेतूच्या द्वारे अनेक लेखक व लेखिकांनी गांधीजींचे चरित्र लिहून काढले व गांधीजींना शब्दबद्ध केले. अशा साहित्यातूनच गांधीवादी विचारांची ओळख होऊ लागली. तेव्हाच त्यांच्या विचारांचा व आचारांचा लोकमानसावर प्रभाव पडू लागला. गांधीजींच्या साबरमती आश्रमात जशी प्रार्थना होते, तशीच प्रार्थना गुरुदेवांच्या शांतिनिकेतनात होत होती. गुरुदेवांचे व्यक्तिमत्त्व असे होते की, 'खरंच गुरुदेवांच्या छत्राखाली थोडे दिवस जरी राहिले तरी जगात कोठेही, कशाही परिस्थितीत आपले सत्व टिकवून राहील.' अशा गोष्टींचा प्रभाव दिसतच होता. ब्रिटिश शासन अत्याचार, जुलूम करतच होते. याचाच परिणाम म्हणजे क्रोधाच्या अग्नीत लोक कोणतेही कृत्य करत होते.

असहकार आणि बहिष्काराखेरीज सरकारला ताळ्यावर आणण्याचा दुसरा उपायच नव्हता हे सर्वांना माहीत होते. 'सायमन कमिशन' भारतात आले तेव्हा ''कमिशनपुढे कोणीही साक्ष देऊ नये, कोठल्याही स्वरुपात तडजोड मान्य करू नये. वेळ आल्यास विधानसभेतील व लोकसभेतील जागा सोडून देण्याची तयारी ठेवावी. राष्ट्रीय सभा व इतर सर्व पक्षांनी मिळून हा बहिष्कार संपूर्ण यशस्वी करावा.''[२९] अशा परिणामांना कमिशनला सामोरे जावे लागले. ठिकठिकाणी 'कमिशन गो बॅक' असे नारे घुमत होते. ब्रिटिशांनी याला उत्तर म्हणून गोळीबार, लाठीमार घडवून आणला. लालाजींनाही यामुळे आपले प्राण गमवावे लागले. याचे देशातील लोकांवर वाईट परिणाम झाले.'' ''आमचा नेमस्तपणा आणि गांधींची अहिंसा दोन्ही भिरकावून देऊन या सरकारचे डोळे उघडतील असे काही तरी केले पाहिजे ! बुद्धीही नाही यांच्याजवळ नि माणुसकीही नाही. आमचा मार्ग बुद्धीमानांसाठी आहे. - गांधींचा मार्ग माणसांच्यासाठी पिसाळलेल्या कुत्र्यांसाठी हे दोन्ही मार्ग कुचकामाचे आहेत.''[३०] असा आवाज सर्वत्र घुमत

होता. असेंब्लितही दोन युवकांनी बॉम्ब टाकले होते ते तरुण भगतसिंग आणि बटुकेश्वर दत्त होते. अशा क्रांतीकारी भावना उदयास येत होत्या. गांधीजींच्या दांडी यात्रेमध्ये अबालवृद्ध सामावलेले होते. प्रत्येक गावात त्यांच्या यात्रेचे स्वागत केले जाई. आश्रमात फक्त स्त्रिया, मुले व आजारी माणसेच होती.

बाळकृष्णाच्या मथुरेत एक लहान मुलगा तिरंगी झेंडा हातात घेऊन लोकांची मिरवणूक काढून चालला होता, तेव्हा त्याच्या मनःाटाचा चुराडा करून ते निशान घेण्यासाठी खुद्द असिस्टंट मॅजिस्ट्रेट साहेब त्याच्यावर धावून गेले होते ! म. गांधीजींनी विलायतेहून दोन घड्याळे मागवलेली होती. तेव्हा नुकताच स्वदेशीचा नारा चालू होता. 'विलायती मालावर बहिष्कार' गांधीजींनीच सांगितला होता; परंतु लोकांना काहीच कळत नव्हते. ''इंग्लंड आणि युरोपात बापूंच्या बरोबर राहणाऱ्या दोन डिटेक्टिव्हांसाठी बापूंनी ती भेट पाठवली होती. ''त्यांच्या दृष्टीने ती 'स्वदेशी' आहेत !'' बापू स्वतः परदेशी मालावर बहिष्कार टाकणारे पण, स्वदेशीचा प्रभाव त्या दोघा मित्रांसाठीही होता. म्हणूनच त्यांचा विचार बोलका वाटतो. ''परदेशी कापड वापरणे हे पाप आहे... परदेशी कापडाची होळी, म्हणजे लाचारीचीच होळी!''[३१] बापूंचे सारेच विलक्षण वाटत. आपापसातले रागद्वेष विसरून लहान मोठे सत्याग्रही एक होत होते. 'फोडा आणि झोडा' या नीतीचा परिणाम असा झाला की, ब्रिटिशांना त्यांच्या हेतू साधण्यास विलंब लागला नाही. 'असहकाराला अपयश येत नसून आपण तो अयशस्वी करत आहोत' असेच जणू काही घडत होते. स्वातंत्र्य संग्रामात उतरल्यामुळे गांधीजींचे राहणीमान बदलले होते. धोतर, पंचा, काठी असा त्यांचा पेहराव असे.

कस्तुरबांना खूप कमी ओळखणाऱ्या मुंबईच्या बाई प्रार्थनेला हजर होत्या. त्यांनी नंतर 'बांना' एक पत्र लिहिले व म्हणाल्या, 'तुमच्यासारख्या सत्त्वशील बाईला, गांधीजी इतक्या कठोरतेने वागवतात, अपमान करतात.' हे वाचल्यानंतर बांनी त्या बाईला पत्र लिहिले की, ''मला तुमचे पत्र वाचून मनाला लागून राहिल्यासारखे झाले आपण कधी

इतक्या निकट आलो नाही. कधी एकमेकांशी आपल्या जीवनाबद्दल बोलण्याचीही वेळ आली नाही, मग तुमचा असा का बरे गैरसमज व्हावा की, गांधीजी मला छळतात?''[३२] हा परिणाम गांधीजींच्या सहवासाचा होता त्यामुळे 'कस्तुरबा' यांच्यासारखी स्त्री स्पष्ट लिहू शकली. कलकत्त्यामध्ये पडलेल्या दुष्काळाचा परिणाम असा झाला की, 'गोदाम उघडून द्या' 'आमचे धान्य आम्हाला परत द्या' लोक अशी घोषणा करू लागले, तेव्हा दिदिमणी लोकांना म्हणतात, ''आपण कष्ट करून पिकवलेले हे धान्य आहे. आपल्या सुजला - सुफला मातीने आपल्याला भरवलेला हा घास आहे. त्यावर या लष्कराचा, या सरकारचा, या रखवालदारांचा काहीही हक्क नाही.''[३३] स्वातंत्र्य संग्रामात संपूर्ण हिंदुस्थान उतरत होता; परंतु ब्रिटिशांच्या कूटनीतीमुळे हिंदु - मुसलमान यांचे ऐक्य नष्ट होत होते. याचाच परिणाम म्हणजे 'पाकिस्तानची' मागणी तेज होत होती. गांधीजी म्हणत होते की, 'जेथे जेथे मुसलमानांचे बहुमत असेल तेथे प्रजेची मते घेऊन त्यांना मान्य असेल तसे स्वायत्त राज्य देण्यास हरकत नाही.' जिना कोणत्याही तडजोडीस तयार नव्हते. संघर्ष निर्माण होत होता. देशाच्या कल्याणासाठी झटणारे देशाचे तुकडे करीत होते. पेरलेले 'विषाचे बीज' उगवण्यात ब्रिटिशांना यश येत होते. जागतिक युद्धाचे परिणाम हिंदुस्थानला दिसत होते. ब्रिटिशांना मदत करण्याचे 'स्वातंत्र्याच्या' अटीवर मान्य होत होते. नेताजींच्या भाषणाचा प्रभाव दिसत होता. ''आमच्या स्वातंत्र्याची किंमत आम्हांला आमच्या रक्तानेच चुकवावी लागेल. आम्ही पुरती किंमत देऊन स्वातंत्र्य मिळवूच आणि आमच्या मनगटाच्या जोरावर ते टिकवू, हिंदी प्रजा अग्निपरिक्षेतून पसार होते आहे. आमच्या स्वातंत्र्याचा अधिकार आम्ही सिद्ध करीत आहोत.''[३४] जसजसा स्वातंत्र्याचा उंबरठा जवळ येत होता, तसे भारतीयांच्यात नवचैतन्य पसरत होते. अखेर १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताने 'स्वातंत्र्य ध्वज' फडकावला. अनेक थोर नेत्यांनी पाहिलेले स्वप्न प्रत्यक्षात उतरले होते.

'पुत्र मानवाचा' ही कादंबरी 'मृणालिनी देसाई' यांनी म.गांधीजींच्या जन्मशताब्दीला प्रकाशित केली. त्यांच्यावर गांधीवादी विचारांचा प्रभाव होता आणि म. गांधीवर लिहिलेल्या कादंबरीला आपोआपच मोल प्राप्त होते. या कादंबरीत गांधीजींच्या जीवनाचा अंश दिसतोच पण, तत्त्वज्ञानाचे ही जवळून आकलन होते. हेच या कादंबरीचे वैशिष्ट्य मानता येईल. आजही ही कादंबरी वाचकाच्या मनावर खोल परिणाम साधते.

## संदर्भसूची


१) देसाई मृणालिनी - 'पुत्र मानवाचा' पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९६९, पहिली आवृत्ती पृष्ठ.उनि ०८ .

२) तत्रैव पृ. ४१ .

३) तत्रैव पृ. ७६ .

४) तत्रैव पृ. ११९ .

५) देशपांडे पु.ल.-'गांधीजी' राजहंस प्रकाशन,पुणे २००४,द्वितीयावृत्ती उनि पृ.३४.

६) देसाई मृणालिनी 'पुत्र मानवाचा' उनि पृ. १५४ .

७) तत्रैव पृ. १७४.

८) तत्रैव पृ. २३२ .

९) तत्रैव पृ. २९० .

१०) तत्रैव पृ. ३०० .

११) तत्रैव पृ. ३१५ व ३१६.

१२) तत्रैव पृ. ३४९ .

१३) तत्रैव पृ. ३७८ .

१४) दैनिक लोकमत (दि. ११ एप्रिल २००९) .

१५) देसाई मृणालिनी 'पुत्र मानवाचा' उनि. पृ. ३४ .

१६) तत्रैव पृ. २२३ .

१७) तत्रैव पृ. ३१६ .

१८) तत्रैव पृ. ३४१ .

१९) जोहारी गजानन - 'जागतिक किर्तीचे १२५ महामानव' मनोरमा प्रकाशन, मुंबई प्रथमावृत्ती जून १९९९ पृ. ५५ .

२०) देसाई मृणालिनी 'पुत्र मानवाचा' उनि पृ. १२ व १३ .

२१) तत्रैव पृ. १३० .

२२) डॉ. पुंडे दत्तात्रय - 'गांधीवाद आणि आधुनिक मराठी साहित्य',
प्रतिमा प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती - १९९५ पृ. २३ .

२३) यंग इंडिया - १९२२ .

२४) देसाई मृणालिनी 'पुत्र मानवाचा' उनि. पृ. १३९ .

२५) तत्रैव पृ. १६१ .

२६) 'स्त्री साहित्याचा मागोवा खंड' -२ इ. स. १९५१ ते २००० .

२७) देसाई मृणालिनी 'पुत्र मानवाचा' उनि. पृ. ४४ .

२८) तत्रैव पृ. ८१ .

२९) तत्रैव पृ. १२६ .

३०) तत्रैव पृ. १३१ .

३१) देशपांडे पु. ल. 'गांधीजी' उनि. पृ. ४२ .

३२) 'देसाई मृणालिनी' 'पुत्र मानवचा' उनि. पृ. २१३ .

३३) तत्रैव पृ. २७८ .

३४) तत्रैव पृ. ३१४-